# फळा
नाक्यावरचा फळा
आमची शान हाय
बीबीसी पेक्षा
मोठा मान हाय

बित्तमबातमी अन्
थेट खबर ओळख त्याची
सुविचार पण असतायत
तोंडी लावायला इथ

बाबरी काय न भिवंडी
रमाबाई अन नामांतर
खैरलांजी बरोबर केणी पण
असत्यात त्या गावाला

मुंबई साहब तर
घाटावरल्या साहब ला
मारल्याच्या अफवा
पण तेजीत

सुंदर हस्ताक्षराची
स्पर्धाच जणू इथ
दुखःद निधन मातर
कोंबडीच्या पायात

खोखो काय कबड्डीची ढाल
ते वर्ल्डकप भारताचा
त्यावर
चित्रमय सारंच

अष्टविनायक यात्रा
ते रक्तदानाचे क्याम्पपण
भरलेत याच्या
जीवावर

ब्यानरच्यापुर्वी
गणपती नवरात्राच्या
कार्यक्रमांना त्यो
एकटाच वाली व्हताय

सावरकर न
गांधी फकस्त
याच्यावर
एकत्र नांदलेत

संपाला तर
ठिकाण हक्काचे
त्याएळी
व्हयायचा ओसंडून

कपडा खात्यातील
भरती
व्हीआरएस ची नोटीस
देत व्हता त्योच

आज टक्के पाणी
कपात आहे
त्यानंच शिकवलय
मला टक्क्यांच गणित

लाल बावट्याच्या
मोर्च्यातल्या
पुर्नविकासाच्या बाचाबाचीतल्या

भाषेतून लाजवसय वकीलाला

खरा मालक एकच
फकस्त शिवराय
त्याच्या पुढ
होतोय नतमस्तक

मागे त्याच्या जागेवरून
धुमश्चक्रीही झाल्यात
एकविचारांची बाळकडू
झालेय आता सर्वपक्षिय

किओक्स लावायच्या
मारल्या गमजा
काहींनी एलसीडी लावून
पाहीलेय स्वप्न बीपी बघायचे
ब्यानरच्या उदयानंतर
नवाकाळच्या उतरतीसंग
हगायला जागा
देतोय कुत्र्यांना .....